**<u>ठळक बातम्या</u>**

- निवडणुका जाहीर न झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा पाळावी, असे सर्वोच्च न्यायालयाचे राज्य निवडणूक आयोगाला निर्देश

- चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत देशाच्या जीडीपीत ८ पूर्णांक २ दशांश इतकी दीड वर्षांतली उच्चांकी वाढ

- मुंबईत बांधकामांमुळे होणारं प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाकडून पाच सदस्यांच्या समितीची स्थापना

- राज्य सरकारच्या विविध सांस्कृतिक पुरस्कारांची घोषणा

**आणि**

- ५६व्या इफ्फीचा आज पणजी इथं समारोप, प्रतिष्ठेच्या सुवर्णमयुर पुरस्कारांसह विविध पुरस्कार जाहीर होणार

**<><><><><>**

निवडणुका जाहीर न झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा पाळावी, जिथे निवडणूक प्रक्रिया सुरू झालेली आहे, तिथल्या निवडणुकांचा निकाल यासंदर्भातल्या याचिकांच्या निर्णयावर अवलंबून असेल, असं सर्वोच्च न्यायालयानं आज स्पष्ट केलं. याप्रकरणी पुढची सुनावणी २१ जानेवारी रोजी होणार आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड कॅप्सूल***

*(राज्यातल्या ४० नगर परिषदा, १७ नगर पंचायती, ८३ पंचायत समिती, १७ जिल्हा परिषद, आणि २ महापालिकांमध्ये आरक्षणाच्या ५० टक्के मर्यादेचं उल्लंघन झालं आहे. बांठिया आयोगाच्या शिफारसीनुसार राज्य सरकारच्या या निर्णयाला याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. त्यावर आज सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठ समोर सुनावणी झाली. उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अधिसूचना जारी करण्याचा मार्ग सर्वोच्च न्यायालयानं*

*मोकळा केला. सध्या निवडणूक प्रक्रिया सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे निकाल या याचिकांच्या निर्णयावर अवलंबून असतील, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं. याविषयी वकील देवदत्त पालोदकर म्हणाले…*

***होल्ड - देवदत्त पालोदकर बाइट***

*याप्रकरणाची पुढची सुनावणी २१ जानेवारीला, तीन सदस्यीय खंडपीठासमोर होईल, असं आज न्यायालयानं आज सांगितलं.*

*सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या निर्णयामुळं निवडणुकांवर टांगती तलवार आहे, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे विधीमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार यांनी दिली आहे.*

***होल्ड… बाईट- वडेट्टीवार)***

**<><><><><>**

राज्य निवडणूक आयोगानं निवडणुकीच्या प्रचारासाठीचा वेळ वाढवून दिला आहे. आता १ डिसेंबर रोजी रात्री १० वाजता प्रचार बंद होईल, असं पत्रक राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश कांकाणी यांनी जारी केलं आहे.

राज्यात नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार असल्यानं सार्वजनिक सुट्टी जाहीर झाली आहे. संबंधित मतदारसंघांच्या बाहेर राहणाऱ्या मतदारांनाही ही सुट्टी लागू असेल.

**<><><><><>**

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगानं प्रभाग प्रारुप मतदार यादीत एकापेक्षा अधिकवेळा नोंद असलेल्या नावांबाबत उपाययोजना करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यासाठी संबंधित मतदारांशी प्रत्यक्ष घरी जाऊन संपर्क साधला जात आहे. दुबार नावांच्या पडताळणीसाठी येणारे निवडणूक कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना नागरिकांनी सहकार्य करावं, असं आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनानं केलं आहे.

**<><><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सहाय्यक विद्याधर महाले हे सरकारी कर्मचारी असूनही जाहीरपणे भाजपाचा प्रचार करत असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. बुलडाणा जिल्ह्यात चिखली मतदारसंघातल्या भाजपाच्या आमदार

श्वेता महाले यांचे पती विद्याधर महाले हे येत्या २ डिसेंबरला होणाऱ्या नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकीसाठी भाजपाचा प्रचार करत असल्याचा व्हिडिओ समोर आला होता. यावर काँग्रेस पक्षानं आक्षेप नोंदवला असून त्यांच्यावर कारवाई करायची मागणी केली. मात्र हा व्हिडिओ निवडणूक जाहीर होण्यापूर्वीचा असल्याचं सांगत आमदार श्वेता महाले यांनी काँग्रेसचे आरोप फेटाळून लावले.

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत देशाचा जीडीपी म्हणजे स्थूल देशांतर्गत उत्पादनात ८ पूर्णांक २ दशांश टक्के वाढ झाली. गेल्या दीड वर्षांतली ही उच्चांकी पातळी आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने आज जुलै ते सप्टेंबर या तिमाहीची आकडेवारी प्रसिद्ध केली. त्यापूर्वीच्या तिमाहीत म्हणजे एप्रिल ते जून दरम्यान जीडीपी वाढ ७ पूर्णांक ८ दशांश टक्के होती. तर गेल्या वर्षीच्या जुलै ते सप्टेंबर या कालावधीत ती ५ पूर्णांक ६ दशांश टक्के होती.

जीडीपीतली ८ पूर्णांक २ दशांश टक्के वाढ ही प्रोत्साहन देणारी असून सरकारच्या विकासाभिमुख धोरणांचा हा परिणाम असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात केलं आहे.

**<><><><><>**

रिझर्व्ह बँकेनं गेल्या कित्येक वर्षात जारी केलेल्या ९ हजारांहून अधिक परिपत्रकांची जागा आता २४४ बृहत परिपत्रकं घेणार आहेत. आज ही परिपत्रक प्रसिद्ध केली जातील, अशी माहिती रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर शिरीष चंद्र मुर्मू यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली. यापूर्वी बँका, वित्तीय संस्था, सहकारी संस्था आणि इतर संस्थांना ९ हजारांहून अधिक परिपत्रकांचं पालन करावं लागत होतं. आता केवळ २४४ बृहत परिपत्रकांची अंमलबजावणी करावी लागणार असल्यानं त्यांच्या कामकाजात सुलभता येणार आहे. गेल्या ५-६ महिन्यांपासून यासाठी प्रयत्न सुरू होते, असंही मुर्मू यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबईत घसरलेला हवेचा गुणवत्ता निर्देशांक पूर्वपदावर यायला काही काळ लागेल, मात्र दिशानिर्देशांचं कठोर पालन केलं, तर बांधकामांमुळे होणारं प्रदूषण नक्कीच कमी करता येईल, असं मत मुंबई उच्च न्यायालयानं आज नोंदवलं. तसंच बृहन्मुंबई महानगरपालिका

क्षेत्रातल्या बांधकामांची पाहणी करणं आणि तिथं दिशानिर्देशांचं पालन होत आहे की नाही, हे तपासण्यासाठी पाच सदस्यांची समितीही मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या पीठानं स्थापन केली. बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळ आणि राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागाचे अधिकारी या समितीत आहेत. गेल्या वर्षी यासंदर्भात योजलेल्या उपाययोजनांबाबत महानगरपालिका आणि प्रदूषण नियामक मंडळानं १५ सप्टेंबर रोजी अहवाल सादर करावा, असे निर्देशही न्यायालयानं दिले.

**<><><><><>**

राज्य शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सन २०२४-२५ या वर्षासाठीच्या राज्य सांस्कृतिक पुरस्कारांची घोषणा झाली आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार यांनी मुंबईत या पुरस्कारांची घोषणा केली. नाटक, संगीत, लोककला, चित्रपट, वाद्यनिर्मिती अशा विविध क्षेत्रांमधले कलावंत तसंच संस्थांना हा पुरस्कार दिला जातो. यात ज्येष्ठ अभिनेते अरुण कदम यांना नाटक विभागात पुरस्कार जाहीर झाला आहे. युवा कलावंतांच्या श्रेणीत अभिनेत्री तेजश्री प्रधान आणि अभिनेता भूषण कडू यांना नाटक विभागात पुरस्कार जाहीर झाले आहेत. अभिनेत्री मधुरा वेलणकर यांना चित्रपट विभागात तर गायक राहुल देशपांडे आणि भाग्येश मराठे यांना उपशास्त्रीय संगीत विभागात पुरस्कार जाहीर झाले आहेत. हे पुरस्कार लवकरच मुंबई इथे आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात येतील.

**<><><><><>**

सुप्रसिद्ध कवी, 'मिर्झा एक्सप्रेस' नावाने ओळखले जाणारे डॉ. मिर्झा रफी अहमद बेग याचं आज, अमरावती इथं निधन झालं, ते ६८ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवाचं दुपारी अमरावतीच्या पठणपूरा येथील इदगाह कब्रस्तानात दफन करण्यात आलं.

मिर्झा बेग यांनी अनेक कवी संमेलनात आपल्या शैलीनं रसिकांमध्ये स्थान निर्माण केलं होते. 'मिर्झाजी कहीन' हा त्यांचा वर्तमानपत्रातील स्तंभ लोकप्रिय झाला होता. मिर्झा यांचे २० काव्यसंग्रह प्रसिद्ध असून मिर्झा एक्सप्रेस या नावाने अफलातून किस्से आणि कवितेचा कार्यक्रम प्रसिद्ध होता. डॉ. मिर्झा हे आपल्या हास्यकविता आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश देणाऱ्या कवितांसाठी ओळखले जात.

**<><><><><>**

५६व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा समारोप आज पणजी इथं 'अ यूजफुल घोस्ट' या चित्रपटानं होत आहे. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर एल. मुरुगन, सचिव संजय जाजू, महोत्सवाचे संचालक शेखर कपूर यांच्यासह विविध मान्यवर आण मनोरंजन क्षेत्रातले कलाकार या समारोप कार्यक्रमाला उपस्थित आहेत. महोत्सवातल्या सर्वोत्कृष्ट चित्रपटाला मानाचा सुवर्णमयुर पुरस्कार, तर दुसऱ्या क्रमांकाच्या चित्रपटाला रौप्यमयुर पुरस्कार यावेळी प्रदान करण्यात येईल. याशिवाय, आयसीएफटी-युनेस्को गांधी पदक, विशेष ज्युरी पुरस्कारांचं वितरणही या सोहळ्यात होणार आहे. प्रसिद्ध अभिनेते रजनीकांत यांच्या चित्रपटसृष्टीतल्या कारकीर्दीला ५० वर्षं पूर्ण झाल्याच्या निमित्तानं त्यांचा विशेष सन्मान केला जाणार आहे. या वर्षी या चित्रपटात ८१ देशांचे जवळपास २५० चित्रपट दाखवले गेले. याशिवाय, मास्टरक्लासेस, वेव्हज बाजार यासह विविध कार्यक्रमांची मेजवानी सिनेरसिकांनी अनुभवली.

**<><><><><>**

राज्य सरकारनं राजेश अग्रवाल यांची मुख्य सचिव पदी नियुक्ती केली आहे. ते १९८९ च्या भारतीय प्रशासकीय सेवेचे अधिकारी आहेत. विद्यमान मुख्य सचिव राजेश कुमार यांचा कार्यकाळ रविवारी संपणार आहे. त्यानंतर राजेश अग्रवाल पदभार स्वीकारतील. ते आयआयटी दिल्लीचे कम्प्युटर सायन्सचे पदवीधर असून यापूर्वी १० वर्षं ते केंद्र सरकारमध्ये विविध पदांवर कार्यरत होते.

//<><><><><>//